१९९८ - १९९९

# पुणे महानगरपालिका



'पर्यावरण शिल्प' मित्र मंडळ चौक, पुणे.

# पर्यावरण अहवाल
## १९९८-९९

# पुणे महानगरपालिका

## पर्यावरण अहवाल १९९८-९९

### पार्श्वभूमी


*निसर्गात नियमित* बदल घडत असतात. दैनंदिन घडणाऱ्या विविध क्रियामुळे निसर्गातील काही घटकांमध्ये वाढ होते तर काही घटक कमी होतात. काही वेळेस नैसर्गिक आपत्तीमुळे निसर्गाच्या आकृतीबंधावर आघात होतो. तरीदेखील निसर्ग आपली सर्व चक्रे पुन्हा पूर्ववत करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करीत असतोच.

मानवाच्या हस्तक्षेपामुळे निसर्गाचे कार्य, नैसर्गिक क्रिया प्रक्रियांवर अनिष्ट परिणाम होत असतात. मानवाची प्रगती अतिशय वेगवान असल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास जलद गतीने होतो आहे. त्यामानाने निसर्गाकडून होणारी उपाययोजना ही संथ गतीने चालते व अशा परिस्थितीत "पर्यावरण समतोल" टिकवण्याची आवश्यकता महत्त्वाची ठरते. पुणे शहरातील पर्यावरण संदर्भात जवळजवळ सर्व क्रिया-प्रक्रियांचे मुख्य नियंत्रण पुणे महानगरपालिकेकडे आहे.


आपल्या देशात शहरीकरणाची प्रक्रिया हा प्रगतीचा एक प्रमुख टप्पा ठरला आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे शहराच्या पर्यावरणावर साहजिकच ताण पडतो. भारतातील बहुतेक शहरांमधून पर्यावरणाचा ऱ्हास झालेला दिसतो, ही वस्तुस्थिती आहे. पिण्याची पाण्याची व्यवस्था, मलनिःस्सारण, कचऱ्यासंबंधी समस्या, हवा, पाणी व ध्वनी यांचे प्रदूषण, रस्त्यावरील वाढती रहदारी आणि होणारे अपघात, वाढत्या लोकसंख्येबरोबर घरांच्या समस्या इत्यादी पर्यावरणासंबंधी गोष्टी एकमेकांशी निगडीत आहेत. या सर्व गोष्टींचा ताण शहरावर पडतो व पर्यायाने शहरातील नागरिकांचे आरोग्य, राहणीमान, उत्पादन क्षमता व उत्पन्न अशा कितीतरी बाबींवर त्याचा परिणाम जाणवतो. देशातील अनेक महानगरांपेक्षा पुण्याची आजची परिस्थिती बरी असली तरी वाढत्या लोकसंख्येबरोबर पर्यावरणासंबंधी निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर वेळीच हात घालण्यात आला पाहिजे. नाही तर या शहराचा पर्यावरणातील ऱ्हास हाताबाहेर जाऊ शकेल. पुण्याच्या पर्यावरणाची परिस्थिती जाणून घेणे व पर्यावरणातील विविध पैलूंचा प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक आहे. पर्यावरणाची सद्यस्थिती दर्शविणारा हा चौथा अहवाल आहे. १९९५-९६, १९९६-९७ या दोन वर्षांचा अहवाल पुणे महानगरपालिकेने 'मशाल' या संस्थेकडून तयार करून घेतला होता. १९९७-९८ चा अहवाल 'चेंज रि इंजिनिअरींग' या संस्थेकडून तयार करून घेण्यात आलेला आहे. सन १९९८-९९ चा अहवाल पुणे महानगरपालिका प्रशासनातर्फेच तयार केलेला आहे. हा अहवाल तयार करताना पूर्वीच्या तीनही अहवालांचे अवलोकन केले आहे.

### लोकसंख्या

स्वातंत्र्योत्तर काळातील चार दशकांचा विचार केला तर पुणे शहराची वाढ ही दरवर्षी २.२ टक्के ते ३.५ टक्के या प्रमाणात झाली आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार पुणे शहरात ७५ मतदान वॉर्ड होते. त्यात सन १९९१ मध्ये वाढ होऊन ८५ वॉर्ड तयार करण्यात आले. नंतर ही वॉर्ड संख्या ११९ एवढी करण्यात आली व अंतिमतः या वॉर्ड संख्येमध्ये वाढ होऊन १२४ वॉर्ड अस्तित्वात आले आहेत.




लिंगरचना, वयोगट रचना १९९१




सन १९९८ मध्ये झालेली अतिरिक्त वाढ नव्याने समाविष्ट झालेल्या ३८ गावांमुळे आहे.

## जमिनीचा वापर व मोकळ्या जागा

शहरी क्षेत्रातील पर्यावरणावर प्रामुख्याने दोन बाबींचा प्रादुर्भाव होत असतो. त्या खालीलप्रमाणे–

(१) जमिनीचा विविध बाबींसाठी होणारा वापर

(२) अंगभूत असणाऱ्या सोयीसवलती

जमिनीच्या वेगवेगळ्या कारणांसाठी एकत्रित वापरामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होत असते. जमीन वापरासंबंधी सार्वजनिक खात्यामार्फत बंधने घालण्यात येत असतात. त्यामुळे पर्यावरणाचा व सार्वजनिक आरोग्याचा दर्जा उच्च राखणे शक्य होते.

पुणे शहरात आढळून येणाऱ्या विविध प्रकारच्या मोकळ्या जागा खालीलप्रमाणे आहेत.

(१) महानगरपालिका देखभाल करीत असलेली कार्यरत उद्याने व नजीकच्या भविष्यकाळात विकसित होणारी उद्याने.

(२) नदी व नाल्यांच्या हिरव्या पट्ट्यात असणाऱ्या जमिनी.

(३) पुणे विद्यापीठ, शेतकी महाविद्यालय यांसारख्या संस्थांच्या मोकळ्या जागा.

(४) टेकड्या व तलाव (उदाहरणार्थ कात्रज, पाषाण तलाव)

(५) वाहन तळ व क्रीडांगणे यांच्या मोकळ्या जागा.

जमिनीचा औद्योगिक व रहिवासी कारणासाठी एकत्रित वापर टाळणे अतिशय महत्त्वाचे आहे. जमिनीच्या वापराचे नियोजन करताना निवासी क्षेत्रातील नियोजन करणे ही बाब अवघड असली तरी अत्यंत महत्त्वाची आहे. सार्वजनिक संस्था या निवासी क्षेत्राच्या उन्नतीसाठी प्रयत्न करीत असतात. खाजगी क्षेत्रातूनही यादृष्टीने प्रयत्न होत असतात. पण खाजगी क्षेत्र निवासी सुविधा किंवा घरे पुरविण्यात असमर्थ ठरले आहे. यामुळे एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ४० टक्के लोक हे दुय्यम दर्जाच्या घरातून राहत आहेत. म्हणूनच अशा विभागांसाठी सार्वजनिक शौचालये, पाणीपुरवठा वगैरेसारख्या सोयी पुरविणे गरजेचे आहे.

## निवासी क्षेत्र

निवासी क्षेत्र ही शहराच्या नियोजनातील महत्त्वाची व तितकीच अवघड बाब आहे. मागील काही दशकात घरबांधणी क्षेत्रात झालेले बदल व वाढ ही लक्षणीय आहे. बरेच वाडे पाडून तेथे नवीन इमारती उभ्या राहिल्या आहेत. वाढत्या बांधकामामुळे शहराच्या मध्यवस्तीत जनसंख्येचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे महानगरपालिकेने विकास हक्क हस्तांतरणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे, जेणेकरून वाढीव बांधकामे दाट लोकवस्तीच्या क्षेत्रात न होता कमी लोकवस्ती असलेल्या क्षेत्रात होऊन काही प्रमाणात लोकवस्ती कमी होणे शक्य होईल.

वाढती लोकसंख्या पाहता निवासी क्षेत्रात पुरेशी घरे उपलब्ध झाली नाहीत तर आगामी काळात घराची टंचाई तीव्रतेने जाणवण्याची शक्यता आहे. कोंढवा, वानवडी, नगररोड, कोथरूड, बिबवेवाडी,

औंध इत्यादी भागात बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी मोठ्या प्रमाणावर बांधकामे केली आहेत. निवासी क्षेत्रासाठी व घरबांधणीस उपयोगी ठरणाऱ्या काही उपाययोजना पुणे महानगरपालिका अमलात आणीत आहे. उदा.

- शेतीखालील क्षेत्राचे निवासी क्षेत्रात रूपांतर
- मध्यवस्तीतील चटई क्षेत्र निर्देशांक कमी करून एकाच ठिकाणी होणारी दाट लोकवस्ती टाळणे.
- वीटभट्टीसाठी राखीव असणारे क्षेत्र निवासी क्षेत्रात बदलणे.
- प्रत्येक इमारतीखालील स्टील्ट वाहनतळ व्यवस्था करणे.

शहरातील वाढती वाहनसंख्या विचारात घेऊन नियोजित इमारतीसाठी स्टील्ट मजले अनिवार्य करून वाहनतळासाठी जागेची उपलब्धता करणे अनिवार्य आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहने उभी करण्याचे प्रमाण कमी होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. स्टील्ट मजल्यामुळे वाहनतळ होऊन इमारतीच्या भोवतालची जागा वृक्षारोपणासाठी किंवा बागेसाठी वापरता येईल.

**झोपडपट्ट्या**


घर ही मानवाची मुलभूत गरज आहे. देशाच्या काही भागात रोजगार उपलब्धतेची कमतरता, पुणे शहराचे झालेले औद्योगिककरण व त्यामुळे उपलब्ध झालेल्या रोजगाराच्या संधी यामुळे ग्रामीण भागातून पुणे शहरात होणारे स्थलांतर वाढत चालले आहे. लोकसंख्येतील नैसर्गिक वाढीमुळे व पुणे शहरात वाढत्या स्थलांतरामुळे आवश्यक असलेल्या जागांची गरज सध्याच्या बांधकामातून पूर्ण होत नाही त्यामुळे झोपडपट्ट्या निर्माण होतात.

सन १९८४ च्या झोपडपट्टी गणनेनुसार ३५० झोपडपट्ट्यांतून सुमारे ४.५५ लाख लोक राहत होते. सन १९७६ ते १९८४ या काळात दरवर्षी अंदाजे ७,६०० झोपड्या वाढल्या. म्हणजेच दरवर्षी अंदाजे अडतीस हजार झोपडपट्टीवासिय वाढले. पुणे शहरातील झोपडपट्टीवासियांची संख्या वाढती असून ती सुमारे ७.५० लाख झालेली आहे. हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ ४० टक्के एवढे आहे. सन १९९८ मध्ये अस्तित्वातील एकूण ४५९ झोपडपट्ट्यांपैकी ३२६ झोपडपट्ट्या या अधिकृत म्हणून झोपडपट्टी निर्मूलन कायद्यानुसार घोषित केलेल्या आहेत.

पुणे महानगरपालिकेच्या पाहणीत खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीचे प्रमाण सर्वाधिक आहे ज्या ठिकाणी सार्वजनिक व अत्यावश्यक नागरी सुविधा उदाहरणार्थ पिण्याचे पाणी, गटारे, रस्ते, शौचालये इत्यादी अपुऱ्या ठरतात तेथील रहिवासी हे उपलब्ध स्थानिक सामग्रीतून घरे उभारतात. जाण्यायेण्याचा खर्च वाचावा म्हणून ते त्याच्या रोजगाराच्या ठिकाणाजवळच झोपडी बांधून राहणे पसंत करतात.

स्थानिक नगरसेवक व जनतेच्या सहकार्याने पुणे महानगरपालिका झोपडपट्टी सुधारणांवर विशेष लक्ष केंद्रीत करीत आहे. झोपडपट्टीवासियांना सार्वजनिक स्वच्छतागृहे, नळकोंडाळी, उघडी गटारे, अंतर्गत रस्ते, रस्त्यांवरील दिवाबत्ती इ. आवश्यक नागरी सुविधा पुरविण्यासाठी संबंधित नगरसेवक व महानगरपालिका प्रयत्नशील आहेत. मात्र महानगरपालिकेतर्फे सध्या पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधांचा दर्जा वाढवून त्या झोपडपट्टीधारकांस अधिक परिणामकारकरितीने पुरविणे आवश्यक आहे.

# पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्या



## नैसर्गिक पर्यावरणाचे स्त्रोत

पुणे शहरात नैसर्गिक पर्यावरणाचे स्त्रोत खालील तीन भागांत विभागले आहेत.

(१) झाडे

सन १९८६ केलेल्या पाहणीनुसार पुणे महानगरपालिका हद्दीत ५ लाख झाडे होती. सन १९९६ साली केलेल्या पाहणीनुसार पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत जवळजवळ १० लाखांपेक्षाही अधिक झाडे आहेत. या पाहणीवरून असे लक्षात येईल की, लोकांची पर्यावरणाविषयी जाण वाढत आहे. वृक्षारोपणाच्या कामामध्ये वेगवेगळ्या सेवाभावी संस्थांच्या प्रयत्नांचा हातभारही मोठ्या प्रमाणावर मिळत आहे.

(२) जलाशय

पाषाण तळे पुणे महानगरपालिकेने १९९५-९६ साली पाषाण तळ्याच्या सभोवताली २० हेक्टर क्षेत्रात सुमारे बत्तीस हजार रोपे लावली आहेत. त्यानंतर उर्वरित १४ एकर क्षेत्रात रोपे लावण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर करण्यात आले आहे. दरवर्षी बरेच स्थलांतरीत पक्षी या तळ्याला भेट देत असल्याने येथील निसर्ग सुधारण्यासाठी व पक्षांचे प्रमाण वाढविण्यासाठी रोपे लावण्याचा मोठा प्रकल्प उद्यान विभागाने हाती घेतला असून तेथे पक्षी अभयारण्य वसविण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे.

कात्रज


पुण्याच्या दक्षिण दिशेला पुणे सातारा रस्त्यानजिक सुमारे ८२ हेक्टर क्षेत्रात वसलेले कात्रज तळे असून त्यातील ६५ हेक्टर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. यातील सुमारे ४० हेक्टर जागेत सुमारे ६५ हजार झाडे लावण्यात आली असून तेथे प्राणीसंग्रहालय उभारण्याची कार्यवाही सुरू आहे.

मॉडेल कॉलनी तळे

पुणे शहराच्या मध्यवस्तीत सुमारे २.४२ हेक्टर क्षेत्रात मॉडेल कॉलनी येथे एक तळे असून या तळ्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी परिसर, इकोनेट व इतर सेवाभावी संस्था प्रयत्नशील आहेत. या तळ्याचे सुशोभिकरण पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागातर्फे केले गेले आहे.

## टेकड्या

पुणे शहर हे सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगात वसलेले असून त्यामुळे शहरास एक आगळेच एक सौंदर्य लाभलेले आहे. पूर्वी शहरातील टेकड्या व डोंगर रांगा गर्द वनराईने आच्छादित होत्या. त्यामुळे शहराचे हवामान आल्हाददायक व आरामप्रद होते. पण वाढत्या शहरीकरणानंतर यातील बऱ्याचशा टेकड्या उजाड झाल्या असून शहराच्या हवामानात अलीकडे फरक जाणवू लागला. आजही काही ठिकाणी टेकड्यांवरील झाडे जगविण्यासाठी व वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तरी पण अनधिकृत झोपडपट्ट्या व बांधकामांमुळे टेकड्यांचे सौंदर्य दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. म्हणूनच पुणे महानगरपालिकेने सर्व टेकड्या ताब्यात घेऊन तेथे मोठ्या प्रमाणावर वनीकरण करणे आवश्यक आहे.


पुणे महानगरपालिका
३८ गावे समाविष्ठ झाल्यानंतरचे पुणे महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र
नैसर्गिक प्रवाह
धानोरी

## पाणीपुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्प

पर्यावरण शास्त्राच्या दृष्टीने शहरास करण्यात येणारा पाणीपुरवठा ही महानगरपालिकेवर आता अत्यंत महत्वाची बाब आहे. भारतातील इतर शहरांच्या तुलनेत पुणे शहरासाठी होणारा पाणीपुरवठा अतिशय समाधानकारक आहे. सध्या शहरास व आसपासच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या सुमारे २५ लाख लोकसंख्येला दररोज ६०२ लक्ष लिटर एवढा पाणीपुरवठा केला जात आहे. मुठा उजवा कालव्यातून होणारा पाणीपुरवठा कालवा उघडा असल्यामुळे वारंवार प्रदूषित होत असतो व गळतीमुळे बरेच पाणी वाया जाते. यासाठी खडकवासला ते पर्वती जलकेंद्रापर्यंत बंद पाईप लाईनचे काम प्रगती-पथावर आहे.

बऱ्याच ठिकाणी पाण्याचे वितरण भिन्नभिन्न प्रमाणत होत असल्याने त्याचा आढावा घेऊन त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठ्यात प्रामुख्याने कमी दाबाने पाणीपुरवठा होणारा भाग, जुन्या जलवाहिन्यांमुळे होणारी गळती व कमी क्षमतेच्या जलवाहिन्या या मुख्य अडचणी आहेत.

सन १९९७ मध्ये पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये ३८ गावांचा समावेश करण्यात आला. हद्दीत आलेल्या या नवीन गावांची पाणीपुरवठा व मलनिःस्सारणाची जबाबदारी पुणे मनपाची आहे. पुणे शहर, पुणे कॅन्टोन्मेंट, खडकी कॅन्टोन्मेंट व या ३८ गावांची सन २०२५ साली होणारी ६७ लाख लोकसंख्या विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेने पाणीपुरवठा व मलनिःस्सारणाचा 'मास्टर प्लॅन' तयार केला आहे. त्यापैकी सन २००५ सालची ३५ लाख लोकसंख्येची पाणीपुरवठा व मलनिःस्सारणाची योजना पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात येणार आहे. सदर योजनेची सन १९९९-२००० च्या किंमत पातळीवरचा खर्च रक्कम रु. ३४४/– कोटी आहे. प्रकल्पाचे काम सन २००३ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या योजनेमध्ये वडगांव-धायरी, वारजे व होळकर पूल येथ जलशुद्धीकरण प्रकल्प उभारावयाचे असून, ठिकठिकाणी संपवेल, पंपहाऊस, पंपिंग मशिनरी बसवून वेगवेगळ्या नऊ पाण्यांच्या टाक्यांमध्ये पाणी पंप करावयाचे आहे व या टाक्यांमधून नवीन आलेल्या भागाला पाणीपुरवठा करावयाचा आहे.

३८ गावांचे सांडपाणी गोळा करून ते मैलाशुद्धीकरण केंद्रापर्यंत वाहून नेणे, त्यासाठी तीन ठिकाणी पंपिंग स्टेशन्स बांधणे व नायडू मैलाशुद्धीकरण केंद्र, भैरोबा मैलाशुद्धीकरण केंद्र या ठिकाणी मैलापाण्यावर प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी देण्याची योजना आहे. या प्रकल्पामुळे पुणे मनपा हद्दीतील सर्व नागरिकांना शुद्ध व निर्जतुंक केलेल्या पाण्याचा पुरवठा १६० लिटर प्रतिमाणशी प्रतिदिनी याप्रमाणे करण्यात येणार आहे. तसेच १०० टक्के मैलापाणी भूमिगत पाईप लाईनमधून गोळा करण्यात येणार आहे. मैलाशुद्धीकरण केंद्रे बांधल्यामुळे नदीत होणारे प्रदूषण थांबविले जाणार आहे.

## जलोत्सारण

जलोत्सारणाच्या व्यवस्थेबाबत सध्या समाधानकारक परिस्थिती आहे असे म्हणता येणार नाही. शहरातील मैलापाणी एकत्रित गोळा करून नेण्याची व्यवस्था असली तरी मैलापाणी प्रक्रिया व पुनर्वापरासाठी उपलब्ध सुविधा पुरेशी नाही. आजमितीस फक्त २२ टक्के मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. मैलापाण्यावर प्रक्रिया व पुनर्वापर सुविधेअभावी मुळा व मुठा नद्यांचे पाणी प्रदूषित होत असते. त्यासाठी नवीन योजना आखून मलनिःस्सारण यंत्रणा अधिक कार्यक्षम व वाढीव क्षमतेची करणे आवश्यक आहे.

शहराच्या विस्तारीत भागात मैलापाणी गोळा करण्याची पद्धत नसल्यामुळे सेप्टीक टँकमध्ये अंशतः प्रक्रिया करणे आवश्यक ठरते.

पुणे महानगरपालिका या सेवा शहरातील भागास पुरेशा प्रमाणात देऊ शकत असली तरी पाणी व जलोत्सारण सेवा महानगरपालिका हद्दीलगतच्या गावात देणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे. पुणे महानगरपालिका प्रशासनाला या समस्यांची जाण असून या सोडविण्यासाठी दीर्घकालीन नियोजन सुरू आहे.

## घनकचरा व्यवस्थापन

घनकचरा व्यवस्थानाचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नाही. नुकत्याच घडलेल्या काही घटनांवरून ही सेवा ही अत्यंत महत्त्वाची सेवा आहे असे दिसून येईल. उदाहरणार्थ सुरतमधील झालेली सांसर्गिक रोगाची सार्वजनिक लागण या समस्येचे मूळ कचरा संकलनाच्या व विल्हेवाटीच्या अपुऱ्या व्यवथेत दिसून आले. दिल्ली शहर स्वच्छ राखण्याबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली महानगरपालिकेस आदेश दिले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता नागरिकांच्या हितासाठी व प्रदूषणाच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापनाचे महत्त्व वादातीत आहे.

पुणे शहरात दररोज अंदाजे १००० टन कचरा निर्माण होतो. यामध्ये २५ टक्के कचरा कोरडा तर ७० ते ७५ टक्के कचरा हा ओला असतो. कोरडा कचऱ्यापैकी बहुतांशी कचरा रॅगपिकर्सद्वारे रिसायगलिंगसाठी पाठविला जातो. सुमारे ५० टन मार्केटयार्डातील कचरा त्यासंस्थेद्वारे विल्हेवाटीसाठी पाठविला जातो. भवानी पेठेसारख्या काही भागातून खाजगी शेतकरी काही प्रमाणांवर कचरा उचलून नेतात.

पुणे महानगरपालिकेचे दोन महत्त्वाचे कचरा डेपो आहेत.

(१) पौड रोड कचरा डेपो (क्षेत्र २९ एकर)

(२) उरळी देवाची कचरा डेपो (क्षेत्र ४५ एकर)

यापैकी पौड रोड कचरा डेपोभोवती मोठ्या प्रमाणावर वस्ती झाल्यामुळे तेथील नागरिकांच्या डेपोबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहे. त्याचप्रमाणे हा डेपो हलविण्यासंबंधी प्रकरणही उच्च न्यायालयात सुरू आहे.


नव्याने समाविष्ट झालेल्या ३८ गावांतून काही सरकारी जमिनी कचरा डेपासाठी उपलब्ध करून द्याव्यात या मागणीवरून शासनाने महानगरपालिकेस सध्या तीन ठिकाणी जागा देऊ केलेल्या आहेत.

(१) वडगाव शिंदे

(२) म्हातोबाची आळंदी

(३) येवलेवाडी

(४) पिसोळीची जागा सध्या विचाराधीन आहे.




## क्षेत्रिय कार्यालयाकडील कचरा उठाव

| अ. क्र. | क्षेत्रीय कार्यालय | सरासरी दर दिवशी गोळा केलेला कचरा (मेट्रीक टन) |
|---|---|---|
| I | औंध | ३५.१ |
| II | घोले रोड | ६९.० |
| III | कर्वे रोड | १३०.६ |
| IV | टिळक रोड | ४५.८ |
| V | सहकारनगर | ५०.० |
| VI | बिबवेवाडी | ५५.० |

| अ. क्र. | क्षेत्रीय कार्यालय | सरासरी दर दिवशी गोळा केलेला कचरा (मेट्रीक टन) |
|---|---|---|
| VII | विश्रामबागवाडा | ५७.३ |
| VIII | कसबा पेठ | ३५.६ |
| IX | भवानी पेठ | ६०.० |
| X | ढोले पाटील रोड | ४८.० |
| XI | येरवडा | ५५.० |
| XII | हडपसर | ५२.० |

कोथरूड कचरा डेपोवरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने नवीन जागेत पारंपारिक कचरा डेपोच्या ऐवजी त्या जागेत कचऱ्यापासून खत, गॅस अथवा वीज निर्मिती प्रकल्प उभारल्यास नागरिकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही.

पुणे महानगरपालिकेतर्फे अशा प्रकल्पांसाठी जाहिरात दिली असून मेडा (महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट ॲथॉरिटी) या संस्थेच्या सहाय्याने यातील काही प्रकल्प निवडले जातील. वेगवेगळी दोन-तीन तंत्रज्ञाने वापरून निरनिराळ्या तीन ठिकाणी असे प्रकल्प उभ केल्यास कचरा डेपोपासून आसपासच्या नागरिकांना होणारा उपद्रव पूर्णपणे थांबणे शक्य होईल.

रुग्णालये व तत्सम संस्थांचा कचरा यांची विल्हेवाट करण्यासाठी निरनिराळ्या उपाययोजनांची आवश्यकता असून त्याचा पाठपुरावा सुरू आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालील दोन बाबींचा समावेश असेल.

रुग्णालये, प्रयोगशाळा अशा ठिकाणी वापरात येणाऱ्या डिस्पोजेबल सिरिंजेस, सुया, कॅथेटर, सलाईन बॉटल्स, ग्लोव्हज वगैरे पूर्णपणे निर्जंतुक करून त्यांचा पुनर्वापर (रि-यूज) होणार नाही अशा रितीने त्यांची मोडतोड करून ते रिसायकलींगसाठी पाठविणे.

रुग्णालये व प्रयोगशाळांमध्ये निर्माण होणारा काही आरोग्यदृष्ट्या धोकादायक कचरा इनसिनरेटसारख्या पद्धतीमध्ये जाळून त्याची विल्हेवाट लावणे. याबाबत केंद्र शासनातर्फे २० जुलै १९९८ अन्वये बायोमेडिकल वेस्ट (मॅनेजमेंट अँड हँडलींग) रुल्स लागू झाले आहेत.

पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे महानगरपालिकेची सर्व रुग्णालये व प्रयोगशाळांमधील कचरा विल्हेवाटीसाठी इन्सीनरेटर बसविला असून तो चांगल्या प्रकारे कार्यान्वित आहे शहरातील अन्य रुग्णालये व दवाखाने यांचेशी पाठपुरावा करून याबाबतीत पुढील पाऊले उचलली जातील.

रस्ते, रहदारी व वाहतूक :

सुरळीत वाहतूक व रहदारी शहरातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत करते.सुरळीत वाहतुकीमुळे शहरातील आर्थिक उलाढाल वाढण्यास तसेच मालाची ने-आण व लोकांच्या प्रवासास मदत होते.

शहरातील लोकांचे जीवनमान, शहरातील वाहतूक व त्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना यांच्यावर अवलंबून असते वाढत्या उत्पन्नाबरोबरच रस्त्यावरील वाहनांचे प्रमाणदेखील वाढत जाते.

वाढत्या शहरीकरणामुळे व दुय्यम दर्जाच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे वाहतूक कोलमडून पडते. दिवसेंदिवस पुणे शहरालादेखील अशा प्रकारच्या वाहतूक समस्यांना सामोरे जाणे भाग पडत आहे. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे –

वाढती लोकसंख्या

वाढती वाहनसंख्या

घरापासून कामाच्या ठिकाणचे वाढते अंतर

सार्वजनिक वाहन व्यवस्थेचा वापर करण्यास अनुत्साह.

**वाहनांची वाढती संख्या**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | सन १९६० | सन १९९० | सन १९९८ |
|---|---|---|---|---|
| १. | बसेस | ४५२ | २,२३० | ६,९०७ |
| २. | ट्रक्स | १५९० | १२,५३० | ५८,६०८ |
| ३. | हलकी व्यापारी वाहने | १८ | ३,४७० | २७,१६२ |
| ४. | मोटारकार, जीप वगैरे | २,६५८ | २४,४७० | १०४,३४९ |
| ५. | ऑटो रिक्षा | २०७ | १८,४९० | ५१,०९० |
| ६. | दोन चाकी | १,३१५ | २,५१,२१० | ६,८५,०४३ |

पेट्रोलवर चालणाऱ्या वैयक्तिक दुचाकी वाहनधारकांची संख्या पुणे शहरात लक्षणीय असून त्यात ९० ते ९६ चे दरम्यान प्रचंड वाढ झालेली आहे. वाढती वैयक्तिक वाहनसंख्या वाहतुकीस व रहदारीस अडचणीची ठरत आहे. शहरातील एकूण वाहनांच्या संख्येपैकी सुमारे ७५.६५ टक्के एवढी दुचाकी वाहने आहेत तर १३.२९ टक्के चार चाकी स्वरूपात म्हणजेच जीप, कार्स व हलकी व्यापारी वाहने आहेत.

या सर्वांमुळे वाहतूक व रहदारीचा प्रश्न, रस्तारुंदीकरणाचा प्रश्न व योग्य वाहतूक यंत्रणा उभी करण्याचा प्रश्न पुणे महानगरपालिकेस भेडसावत आहे. पुणे महानगरपालिकेने सार्वजनिक बस सुविधा उपलब्ध करून दिलेली असली तरी दुचाकी वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ व लोकांची सार्वजनिक बस सुविधेविरूद्ध असणारी मानसिकता यामुळे रस्ते वाहतूक व रहदारीचा प्रश्न कठीण होत चाललेला आहे.

रस्त्यावरील अडथळे, मंद गतीची वाहने, वाहतुकीची कोंडी याबाबी पुणे शहरातील रस्त्यावर प्रकर्षाने जाणवतात. ऐन गर्दीच्यावेळी दाट लोकवस्तीमधील मध्यवर्ती भागात वाहतुकीचा वेग पायी चालणाऱ्या माणसाएवढा असतो. दाट लोकवस्तीतील इतर भागात तो सायकलच्या गतीएवढा आढळतो. विरळ वस्तीमध्येसुद्धा वाहतुकीचा वेग तासाला जेमतेम ४० किलोमीटर एवढा कमी दिसून येतो.

वाहतुकीचा ताण ज्या ठिकाणी जास्त पडतो अशी काही ठिकाणे निश्चित करण्यासाठी प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते व चौक यांची तपशिलवार पाहणी करणे आवश्यक आहे. या सर्व पाहणीच्या आधारे वाहतूक व्यवस्थेचे चांगल्याप्रकारे नियोजन करता येईल. यासाठी नवीन रस्ते करणे, जुने रस्ते रुंद करून रस्ते व कॉरिडॉर्स यामध्ये तांत्रिक सुधारणा यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. याचबरोबर सार्वजनिक वाहतूक सेवेची विश्वासार्हता वाढवणे तितकेच महत्त्वाचे आहे.

## अपघात व अपघाती मृत्यू :

रस्त्यावरील अपघातांच्या नोंदी पाहता त्यात वर्षानुवर्षे सातत्याने चढउतार व अनियमितपणा दिसून येतो. उपलब्ध माहितीनुसार अनेक अपघातांपैकी पुणे-मुंबई महामार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण २३.७५ टक्के आहे, पुणे-सोलापूर रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण ६.७५ टक्के व पुणे-सातारा रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण ६.४ टक्के दिसून येते. शहरांतर्गत होणाऱ्या अपघातांपैकी ६० टक्के अपघात प्राणघातक स्वरूपाचे असतात असे दिसून येते.


**पुणे पोलिस आयुक्त परिक्षेत्रातील मोटार अपघात सन १९९१ ते १९९८ पर्यंतचा तक्ता**

| अ. क्र. | सन | मृत्यु अपघात | गंभीर अपघात | किरकोळ अपघात | विनादुखापतीचे अपघात | एकूण अपघात |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९१ | २६८ | ३५१ | १२६५ | ६५ | १९४९ |
| २. | १९९२ | २७३ | ३९४ | १५१७ | ५७३ | २७५७ |
| ३. | १९९३ | २७८ | ४३० | ११२९ | ४४५ | २२८२ |
| ४. | १९९४ | २५८ | ४३१ | १२२० | २७५ | २१८४ |
| ५. | १९९५ | ३०८ | ४५९ | १४५० | ३७५ | २५९२ |
| ६. | १९९६ | २७१ | ४२६ | १३२८ | २५४ | २२७९ |
| ७. | १९९७ | ३०२ | ३७६ | १६४४ | ३६५ | २६८७ |
| ८. | १९९८ | ३३४ | ३२९ | १५७४ | ४०७ | २६४४ |

अधिक विश्लेषणावरून असे दिसते की, २० टक्के प्राणघातक अपघात रात्री १२ ते सकाळी ८ याच काळात घडतात. वाहतूक विभागाने नवीन योजनांच्या अंतर्गत शहरात अधिकाधिक वाहतूक नियंत्रक दिवे बसविण्याचे काम पूर्ण केले आहे. तसेच शहरात अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक, पादचारी मार्ग, नवीन वाहन तळांची निर्मिती, पे अँड पार्क योजना अंमलात आणल्या आहेत. शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी उड्डाण पूल व अनेक मजली वाहनतळ, हातगाड्या व पथाऱ्याविरहित रस्ते अशा योजना महानगरपालिकेच्या विचाराधीन आहेत. त्या लवकरात लवकर अंमलात आणणे व त्यांची योग्यप्रकारे कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय शहरातील वाहतुकीत सुधारणा होऊन अपघातांचे प्रमाण कमी होणे अवघड आहे.

खाजगी वाहनांची संख्या प्रतिवर्षी वाढतच आहे. विशेषतः व्यक्तीगत वापरांसाठीच्या वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. सार्वजनिक सेवेकरिता चांगल्या वाहनांच्या संख्येत म्हणावी तेवढी वाढ दिसत नाही.

सन १९९१ च्या जनगणनेच्या बारकाईने अभ्यास केला तर असे लक्षात येते की या दोन ते तीन वर्षांत सुमारे ३ लाख युवक-युवती हे १६ व्या वर्षात पदार्पण करतील. त्यामुळे नजीकच्या काळात वाहनचालक परवाना मिळविणाऱ्यांच्या संख्येत प्रचंड वाढ होणार आहे.




**पुणे महानगरपालिका हद्दीतील हवेचे प्रदूषण**

| अ. क्र | स्टेशन | सस्पेंडेड पार्टिक्युलेट मॅटर मायक्रोग्रॅम / घनमीटर |
|---|---|---|
| I | सेनादत्त पोलीस चौकी | ७३७.७१ |
| II | प्रभात रोड | ४५०.७७ |
| III | पौड फाटा | ५९१.९३ |
| IV | सिमला चौक | ७३२.०६ |
| V | अलका चौक | ५७६.७२ |
| VI | स्वारगेट | ८५०.९९ |
| VII | हडपसर | १४४५.४१ |
| VIII | पुणे रेल्वे स्टेशन | ६५०.२४ |
| IX | नगररोड | ४५०.०९ |
| X | लक्ष्मीरोड | ७३८.४३ |

## प्रदूषण

प्रदूषणासंबंधी सद्यस्थिती

| अ.क्र. | परिसर | सरासरी | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | नायट्रोजन ऑक्साईड मायक्रोग्रॅम / घनमीटर | सल्फर डायऑक्साईड मायक्रोग्रॅम / घनमीटर | सस्पेंडेड पार्टिक्युलेट मॅटर मायक्रोग्रॅम / घनमीटर |
| १. | सेनादत्त पोलिस चौकी | ९९.४१ | ६२.४१ | ७३७.७१ |
| २. | प्रभात रोड | ७०.६५ | ४०.६५ | ४५०.७७ |
| ३. | पोड फाटा | ५७.९९ | ६०.६३ | ५९१.९३ |
| ४. | सिमला चौक | १३०.११ | ८७.०१ | ७३२.६ |
| ५. | अलका चौक | ७६.०५ | ५२.१४ | ५७६.७२ |
| ६. | स्वारगेट | ११७.८२ | ७१.७८ | ८५०.९९ |
| ७. | हडपसर | ७४.४५ | ७०.०५ | १४४५.४९ |
| ८. | पुणे रेल्वे स्टेशन | ८१.२४ | ६०.७५ | ६५०.२४ |
| ९. | नगररोड | ४८.०९ | ६०.१२ | ४५०.०९ |
| १०. | लक्ष्मीरोड | ८८.७९ | ५३.७५ | ७३८.४३ |

पुण्यातील हवेच्या प्रदूषणास प्रामुख्याने वाहतूक व्यवस्था कारणीभूत आहे याची कारणे –

वाहनांची वाढती संख्या, वाहतुकीच्या गाड्यांमुळे घरापासून कार्यालयांपर्यंत वाहतुकीस लागणारा वाढता वेळ, सार्वजनिक वाहन व्यवस्थेवर अवलंबून न राहण्याची वृत्ती व वाहनांची अपुरी देखभाल, पेट्रोलमधील भेसळ इत्यादीमुळे दाट वस्तींमधील रस्त्यांवरील प्रदूषण दिवसेंदिवस वाढते आहे.

पुणे विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाच्या पथकाने "मशाल" "रमझानी इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सर्व्हिसेस"च्या पथकांनी व अलिकडेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पथकांनी पुण्यातील हवेच्या प्रदूषणाचा अभ्यास केलेला आहे. वाहनांच्या धुरावाटे बाहेर पडणाऱ्या दूषित वायूतील घटक हायड्रो कार्बन, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड डिझेल पार्टीकल्स इत्यादि मानवी आरोग्यास अपायकारक आहेत.

पुणे शहरातील हवेच्या वाढत्या प्रदूषणास प्रामुख्याने दुचाकी वाहने, तीनचाकी रिक्षा, सहा सीटर रिक्षांची वाढती संख्या कारणीभूत आहे. अनेक प्रदूषणांपैकी जवळजवळ ७० टक्के प्रदूषण हे वरील प्रकारच्या वाहनामुळे होत असते. पेट्रोल वाहनांच्या तुलनेत डिझेलवर चालणारी वाहने कार्बन मोनॉक्साईड प्रदूषण फार मोठ्या प्रमाणात वाढवतात.

## पुणे महानगरपालिका हद्दीतील हवेचे प्रदूषण



सिमला ऑफिस चौक, पौड फाटा व पुणे रेल्वे स्टेशन या ठिकाणी सल्फर डायऑक्साईडचे प्रमाण सर्वाधिक असल्याने आढळून आले आहे. हे प्रदूषण जड वाहने, बसेस व वाहनांची कोंडी यामुळे झालेले आहे. वाहनांमधून निघणारा धूर नायट्रोजन ऑक्साईड प्रदूषणाला कारणीभूत ठरतो. त्यामुळे वाहनांची जास्त संख्या अशा प्रदूषणाला निमंत्रण ठरते. स्वारगेट चौक व पुणे रेल्वे स्टेशन परिसर येथे नायट्रोजन ऑक्साईडचे प्रदूषण नेहमतीच धोक्याच्या पातळीच्या वर आढळते. शहराच्या इतर रहदारीच्या भागात नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण सकाळी व सायंकाळी धोक्याच्या पातळीपर्यंत असते. हवेतील एसपीएम (सस्पेंडेट पार्टिक्युलेट मॅटर्स) चे प्रमाण मात्र वरील सर्वेक्षणात केलेल्या भागात मान्य मर्यादेपेक्षा अधिक आढळते.

वाहनांमुळे निर्माण झालेल्या वातावरणातील प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व शहरावर अनिष्ट परिणाम होतो हे प्रदूषण थांबविण्यासाठी वाहनांची नियमित तपासणी करणे व शिसेविरहित पेट्रोलची विक्री करणे या पद्धती जरी अवलंबिल्या जात असल्या तरी त्यास व्यापक रूप देणे आवश्यक आहे.

वाहतुकीच्या विविध महत्त्वाच्या ठिकाणी वातावरणाचं सर्वेक्षण करून प्रदूषण कमी करण्यासंदर्भात उपाययोजना कराव्या लागतील असे केले तरी हवेचे प्रदूषण टाळण्यासाठी अधिक प्रभावी वाहतूक-व्यवस्था करण्याची पुणे शहरास गरज आहे.

**जलप्रदूषण**

पाण्याच्या प्रदूषणाचे मुख्य कारण म्हणजे शहरातील बरेचसे मैलापाणी त्यावर प्रक्रिया न करताच नदीत सोडले जाते. नदीकिनारी बऱ्याच ठिकाणी झोपडपट्ट्याही असल्यामुळे नदी प्रदूषित होते. काही ठिकाणी औद्योगिक सांडपाणीसुद्धा योग्य प्रक्रियेशिवाय नदीत सोडले जाते. परंतु पुणे शहरात असे प्रमाण फारच कमी आहे. मुळा-मुठा नद्यांतील पाण्याच्या प्रदूषणाच्या पातळीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणचे पाण्याचे नमुने घेऊन त्यांची तपासणी ईम्पॅक्ट इंडिया, थरमॅक्स व पुणे विद्यापीठातर्फे करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेतर्फेही असे नमुने घेण्याची व त्याची तपासणी करण्यास सुरवात करण्यात आली आहे. तपासणीअंती असे आढळून आले आहे की, नद्यांचे पाणी फक्त शेतीसाठी चालेल असे आहे पिण्यासाठी या पाण्याचा उपयोग करण्यासारखी परिस्थिती नाही.

भूजलासंबंधी अभ्यास करताना जमिनीखालील पाण्यात कॅल्शियम, मॅग्नेशियम व पोटॅशियमचे प्रमाण वाढत्या डिटर्जंटच्या वापरामुळे वाढलेले दिसले. शहराचा बराच मैला प्रक्रिया न करताच पुढे जात असल्यामुळेदेखील जमिनीतील पाण्याचे प्रदूषण वाढते आहे.

पुण्यातील तलावासंबंधी अभ्यास करताना या तलावातील बी. ओ. डी. व सी.ओ.डी.च्या वाढत्या प्रमाणामुळे या तलावातील जलचराचे आयुष्य धोक्यात आलेले आहे असे दिसून येते कात्रज तलावाचे पाणी एकेकाळी पिण्यासाठी वापरले जायचे पण सध्याच्या परिस्थितीत ते पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही.

गेल्या वर्षी मुठा नदीत व लोहगाव येथील एका खाणीमध्ये हजारो माशांचा जीव जलप्रदूषणामुळे गेला असे आढळून आले.

## ध्वनी प्रदूषण

शहरामधील ध्वनी प्रदूषणाचे मुख्य कारण म्हणजे वाहतुकीचे वाढते प्रमाण हे आहे. रेल्वे लाईन, उद्योग धंदे, बांधकाम क्षेत्र, वगैरे ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदूषण होत असते. "मशाल" संस्थेतर्फे शहरातील काही प्रमुख वाहतूक कोंडीच्या ठिकाणी ध्वनी प्रदूषणासंबंधी पाहणी केली असता असे आढळून आलेले आहे की, ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण विभागाच्या मान्य प्रमाणापेक्षा दीडपट आहे. विशेष करून पौड फाटा, बंडगार्डन रोड, सिटी सर्व्हे ऑफिस चौक, म्हात्रे पूल या ठिकाणी ध्वनीप्रदूषण पातळीत अधिकाधिक वाढ झाल्याचे दिसून येते. या अभ्यासाद्वारे पुणे शहरातील इस्पितळे व शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था यांच्या सभोवतालच्या १०० मीटरचा परिसर ध्वनीमुक्त ठेवावा अशी सूचना करण्यात येत आहे अकारण हॉर्न वाजवणे, वाहतुकीच्या नियमाची कडक अंमलबजावणी करणे, अकारण वाहतूकीस अडथळा येणार नाही अशी व्यवस्था करणे, जड वाहनांना दिवसा शहरात रस्त्यावर प्रवेश बंद करणे अशा प्रकारच्या उपाययोजना केल्यास ध्वनीप्रदूषण कमी होण्यास निश्चितच मदत होईल.

याबाबतीत योग्य उपाययोजना केली नाहीतर ध्वनीप्रदूषणामुळे होणाऱ्या उच्च रक्तदाब, हृदय विकार, लक्ष केंद्रित न होणे इत्यादींसारख्या मानसिक ताणामुळे उद्भवणारे गंभीर स्वरूपाचे धोकादायक आजार वाढण्याची शक्यता आहे.


## सार्वजनिक आरोग्य

*आनंदी काळजीमुक्त आरोग्य हा मानवाचा मुलभूत हक्क मान्य करण्यात आलेला आहे.* सार्वजनिक आरोग्य कोठल्याही धार्मिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक पद्धतीपासून मुक्त असणे अनिवार्य आहे.

पुणे महानगरपालिकेतर्फे डॉ. नायडू संसर्गजन्य रुग्णालय येथे संसर्गजन्य आजारांचे रुग्ण दाखल करून घेतले जातात या रुग्णालयातील दाखल केलेल्या रुग्णांच्या संख्येवरून शहरामध्ये कोणत्या प्रकारचे आजार आहेत याविषयी निश्चित माहिती मिळण्यास उपयोग होतो. मागील वर्षात पुणे शहरातील संसर्गजन्य आजारांचे दाखल केलेल्या रुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | सन १९९६ | सन १९९७ | सन १९९८ |
|---|---|---|---|
| (१) गॅस्ट्रो – | २३०२ | २४७७ | २९८८ |
| (२) कॉलरा – | २२५ | ११९ | ९२ |
| (३) काविळ – | १७८ | १२७ | ८७ |
| (४) विषमज्वर – | १० | १२ | १५ |
| (५) पोलिओ – | ० | ० | ० |
| (६) घटसर्प – | १९ | २५ | १२ |
| (७) डांग्या खोकला – | ० | ० | ० |
| (८) धनुर्वात – | २३ | ३० | १७ |

## ध्वनी तीव्रता प्रमाण




| अ. क्र. | विभाग | ध्वनीची तीव्रता डेसिबिलमध्ये |
|---|---|---|
| I | नगररोड (येरवडा) | ७८ |
| II | बंडगार्डन रोड | ८० |
| III | सिटी सर्व्हे ऑफिस चौक | ८० |
| IV | पौड फाटा | ८४ |
| V | विद्यापीठ चौक | ७६ |
| VI | म्हात्रे पूल चौक | ८० |
| VII | ससून रुग्णालय चौक | ७८ |

Table: पुणे शहरातील ध्वनीप्रदुषण

एच.आय.व्ही. लागण झालेल्या व्यक्तींची संख्या पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर आहे. राज्यातील प्रमुख तीन शहरांपैकी पुणे हे एक प्रमुख एच.आय.व्ही. ग्रस्त व्यक्ती असलेले शहर आहे. इतर दोन शहरे म्हणजे मुंबई व सांगली. डॉ. कोटणीस आरोग्य केंद्राच्या पाहणीनुसार एच.आय.व्ही. लागण झालेल्या रुग्णांची संख्या १९८९ च्या तुलनेत दरवर्षी वाढत चाललेली आहे. पुणे महानगरपालिकेने एडस् प्रतिबंधक उपाययोजना मोठ्या प्रमाणावर चालविल्या असून त्यासाठी निरनिराळ्या सेवाभावी संस्थांची मदत घेण्यात येत आहे.

## स्वच्छ पुणे मोहीम

पुणे महानगरपालिकेतर्फे सुरत शहरातील स्वच्छता मोहिमेचा अभ्यास करून नागरी व सेवाभावी संस्था यांच्या मदतीने शहर स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. एक मे १९९७ रोजी सदर मोहिमेस सुरवात करण्यात आली असून या मोहिमेची खालील वैशिष्ट्ये नमूद करता येतील.

(१) कचरा वाहतुकीसाठी पुरेशी यंत्रसामग्री
(२) प्रशासकीय शुल्क वसुली
(३) गांडूळ खत निर्मिती प्रकल्प
(४) रॅगपिकर्सचा कचरा उचलण्यासाठी सहभाग
(५) रुग्णालयाचा कचरा उचलण्यासाठी इनसिनरेटरची व्यवस्था
(६) लोक प्रशिक्षण

## कत्तलखाना

पुणे महानगरपालिकेने आस्तित्वात असलेल्या कत्तलखान्याचे आधुनिकीकरण करण्याचे योजले असून नियोजित प्रकल्पाचा अंदाजे खर्च रुपये ८ कोटी आहे यासाठी केंद्र शासनाकडून कमीतकमी ५० टक्के खर्च अनुदान स्वरूपात मिळणार असून त्यापेक्षा जादा रक्कम मिळणेविषयी महानगरपालिका प्रयत्नशील आहे.

त्याचप्रमाणे उरुळी देवाची येथील कचरा डेपोवर मृत प्राण्यांच्या विल्हेवाटीसाठी एक प्रकल्प राबविला जाणार असून त्यासाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अनुदान मिळणार आहे.

## मुठा नदी सुधारणा प्रकल्प

पुणे शहरात मुळा-मुठा नदीचे पात्र आहे. पुणे मनपाने मुठा नदीच्या पात्राची सुधारणा करण्याचा कार्यक्रम १२ वर्षापूर्वीच हाती घेतला आहे. या योजनेनुसार नदीतील गाळ काढणे, मध्यवर्ती चॅनेल व विस्तृत चॅनेलच्या भिंती बांधणे या प्राथमिक गोष्टी पूर्ण करीत आणल्या आहेत. तसेच नदीच्या पात्राच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

पुणे शहराच्या मुठा नदीच्या सुधारणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निरनिराळ्या संस्थांकडून, आर्किटेक्ट, प्लॅनर, डिझाईनर यांचेकडून नदी सुधारण्याबाबत योजना मागविण्यात आल्या होत्या.

जाहिरातीला प्रतिसाद चांगल्याप्रकारे मिळून सुमारे दहा जणांनी आपापल्या योजना मनपास सादर केल्या होत्या. सादर करण्यात आलेल्या १० स्पर्धकांच्या निवडक भागांचे एकत्रीकरण करण्यात येवून अंतिम स्वरूपातील योजना तयार करण्यात येणार आहे. या योजनेत नदी काठाने रस्ते बांधणे, उद्यान तयार करणे, वृक्षारोपण, व्यापारी संकुल उभे करणे, वाहनतळासाठी जागा उपलब्ध करणे, करमणूक केंद्र स्थापन करणे इ. कामे समाविष्ट आहेत.

सदरचा अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारित) कायदा, १९९४, कलम ६७ (अ) अन्वये तयार करण्यात आला आहे. यापूर्वी तीन अहवाल करताना १९९५-९६, १९९६-९७ चे अहवाल "मशाल" या संस्थेकडून करून घेण्यात आले होते. त्याचप्रमाणे सन १९९७-९८ चा अहवाल चेंज रि-इंजिनिअरिंग या संस्थेने तयार केला होता.

१९९८-९९ चा अहवाल पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडून तयार करण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रात आढळून येणाऱ्या पर्यावरणाच्या विविध पैलूंची सद्यस्थिती मांडण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. वरील विवेचनातून अनुमानीत होणाऱ्या बाबींची कालबद्ध अंमलबजावणी करणे हे महानगरपालिका प्रशासनाचे कर्तव्य आहे. त्यादृष्टीने प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात प्राधान्यक्रम ठरवून तरतूद करणे व घेतलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे याकरिता सर्वांचे सहकार्य असणे आवश्यक आहे.

पुणे शहराला लाभलेले नैसर्गिक वरदान, मानवी दुर्लक्षामुळे हरवले गेले अशी परिस्थिती येऊ नये ही या शहरातील नागरिक व संस्थांची एकत्रित जबाबदारी आहे.

हा अहवाल तयार करण्यासाठी डॉ. अनिल रावेतकर, आरोग्यप्रमुख आणि डॉ. धनंजय चांदककर, सहायक आरोग्यप्रमुख यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत याशिवाय हा अहवाल तयार करण्यासाठी अनेक स्थानिक संस्थांची व व्यक्तींची मदत झाली आहे. त्याबाबत आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका.

पुणे.

दिनांक :